क्र. लउधो/२०/अखंडित प्र.उ./प्रमाणपत्र/बी-३९६६
उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२

दिनांक :- ०९/०४/२००७

प्रति,

**व्यवस्थापकीय संचालक,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१

**विषय:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे आदेश दि. ७.२.२००७**

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे आदेश क्र.५९/२००६ दि.७.२.२००७
२) या कार्यालयाचे पत्र क्र.डीआय/पॉवर/०७/अे-७८०३ दि.५.३.०७
३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग. क्र.एसएसआय-२००७/(१२६६)/उद्योग-७ दि. ४ एप्रिल, २००७

महोदय,

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे आदेश दि. ७.२.२००७ नुसार अखंडित प्रक्रिया उद्योग घटकांना प्रमाणित करण्याचे अधिकार मा. विकास आयुक्त (उद्योग) यांना देण्यात आले आहेत. या संदर्भात दि. ८.३.२००७ रोजी झालेल्या सभेतील निर्णयाप्रमाणे आपण अखंडित/खंडित प्रक्रिया उद्योगांच्या वर्गवारीबाबतची (स्टेटस को) जैसे थे परिस्थिती कायम ठेवली असल्याची हया संचालनालयाची धारणा आहे व तसे या कार्यालयाला कळवावे. तसेच यापूर्वी अखंडित प्रक्रिया उद्योगांना मान्यता शासनामार्फत किंवा महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अथवा महावितरण यांचे मार्फत दिले जात असे. अशा सर्व मान्यता असलेल्या उद्योगांची मान्यतेबाबतची स्थिती दि. ७.२.२००७ रोजी जशी असेल तशीच यापुढेही कायम राहील. या सर्व उद्योगांना यापुढेही अखंडित प्रक्रिया उद्योग म्हणूनच मान्यता राहील. त्यांना वेगळे प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही. परंतु जर या जैसे थे परिस्थितीत काही उद्योगांबाबत महावितरणला त्यांची स्थिती बदलणे आवश्यक वाटत असेल तर.,त्याबद्दल सोबत जोडलेल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये नमुद केलेल्या

समिती पुढे आपले अभिप्राय मांडावेत जेणे करुन त्यावर निर्णय घेता येईलया संदर्भात शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने शासन निर्णय क्र.एसएसआय-२००७/(१२६६)/उद्योग-७ दि.४ एप्रिल, २००७ रोजी निर्गमित केला असून (प्रत सोबत जोडली आहे) त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. या शासन निर्णयानुसार या कार्यालयाने तयार केलेली मार्गदर्शक तत्वे सोबत जोडली आहेत. तसेच ही मार्गदर्शक तत्वे महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाने निर्गमित केलेल्या परिपत्रक दि.११.१.१९९६ मध्येही नमूद केलेली आहेत.

ही तत्वे आपल्याच परिपत्रकानुसार केलेली असल्यामुळे यापुढे या यादीतील उद्योग घटकांना विकास आयुक्त (उद्योग) यांचे कार्यालयाकडून वेगळे प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही. या सर्व उद्योगांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाच्या दिनाकांपासून म्हणजेच दि. ७.२.२००७ पासून मान्यता देण्यात येत आहे. याची नोंद घ्यावी व या सर्व उद्योगांना त्याप्रमाणे अखंडित उद्योग मानून वीज मंडळाने पुढील कार्यवाही करावी. तसेच हे आपल्या अखत्यारीतील सर्व कार्यालयांना कळवावे, जेणेकरुन उद्योगांना त्यानुसार सत्वर मदत मिळू शकेल.

आपला विश्वासू,

विकास आयुक्त (उद्योग)

प्रत माहितीसाठी:-

१. सर्व विभागीय आयुक्त
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, म.औ.वि.मं, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
३. उद्योग सह संचालक (सर्व)
४. अधिक्षकीय उद्योग अधिकारी, उप विभागीय कार्यालय, द्वारा जिउकें, नांदेड
५. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, (सर्व)
६. मुख्य अभियंता/अधिक्षकीय अभियंता, महावितरण, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
७. अध्यक्ष,